# मुंबई विद्यापीठ

क्र. आय.आय.एल/आयसीसी/२०२४-२५/०६

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग आणि संलग्न महाविद्यालये यांना या परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ मार्फत MU-IDEAS Foundation Incubation Center व स्टार्टअप क्लिनिक (Startup Clinic) यांच्या संयुक्त विद्यमाने "आयडियाथॉन २.०" या स्पर्ध्येचे आयोजन करण्यात आले आहे.

"आयडियाथॉन २.०" या स्पर्धेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना पाठबळ देऊन स्टार्ट-अप मध्ये रुपांतर केले जाणार आहे. या उपक्रमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे विद्यापीठाच्या परिक्षेत्रात स्थापन करण्यात आलेल्या ४७ स्टार्ट-अप क्लिनिकच्या माध्यमातून पहिल्या स्तरावर सादरीकरण झाले आहे व त्यातून निवडक प्रस्तावांचे अंतिम सादरीकरण होणार असुन त्यातुन उत्कृष्ठ ठरणाऱ्या विविध नवउद्योजकांच्या नाविण्यपूर्ण कल्पनांचे व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य उपक्रमांमध्ये रुपांतर करण्यास प्रोत्साहन आणि पाठबळ दिले जाणार आहे.

सदर परिपत्रकाव्दारे मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/ आविष्कार प्राध्यापक समन्वयक यांना सुचित करु इच्छितो की, "आयडियाथॉन २.०" या स्पर्धेमध्ये आविष्कार स्पर्धेतील विजेत्यांसाठी एक सुवर्ण संधी उपलब्ध करुन दिली जात आहे. **आविष्कार विजेत्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष बाब म्हणुन "आयडियाथॉन २.०" या स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात येत आहे.**

सदर स्पर्धेत विजयी स्पर्धकांना खालील प्रमाणे बक्षिस वितरण केले जाईल.

| | |
|---|---|
| **प्रथम क्रमांक** | **१०,०००/-** |
| **व्दितीय क्रमांक** | **७,५००/-** |
| **तृतीय क्रमांक** | **५,०००/-** |

......२/ -

आविष्कार विजेत्या विद्यार्थ्यांनां "आयडियाथॉन २.०" या स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी https://tinyurl.com/AvishkarD2E या लिंकचा वापर करुन प्राचार्यांच्या स्तरावर अर्ज भरता येईल. सदर स्पर्धमध्ये सहभागी होण्यासाठी अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ०३/०१/२०२५ रोजी सायंकळी ६.०० वाजेपर्यंत असेल.

२७ डिसेंबर, २०२४
मुंबई – ४०० ०९८

प्रा. डॉ. सचिन श्या. लड्डा
संचालक
नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ